ePaper

# शरद पवारांना शिवसेनेचं हिंदुत्व मान्य": जितेंद्र आव्हाड



| वर्ष - 7 | अंक - 114 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- एकच वादा नीरज दादा!
- आयुषमान इतका बहुरंगी!
- मोदींना ग्रीसचा दुसरा सर्वोच्च सन्मान!
- राष्ट्रवादीमध्ये फूट पडली नाही!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 26 ऑगस्ट 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# शहरात विलास लांडेंचा 'दबदबा कायम'!

## » उपमुख्यमंत्र्यांचा दौरा : महापालिकेतील बैठकीत पवार, सिंग अन् लांडेंचीच 'हवा

।पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शिवसेना-भाजपा महायुतीमध्ये सहभागी होत उपमुख्यमंत्री झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अजित पवार यांनी शुक्रवारी पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. त्याचे कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी जंगी स्वागत केले. तसेच, शहरातील विविध विकासकामांबाबत त्यांनी महापालिका भवनमध्ये बैठक घेतली. मात्र, हा दौरा तीन लोकांनी गाजवला... स्वत: अजित पवार, महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि माजी आमदार विलास लांडे.**



पिंपरी-चिंचवडमधील "वेस्ट टू एनर्जी" सारख्या प्रकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतूक केले. विकासकामांच्या बाबतीत प्रशासनाने कोणतही हयगय करु नये. राज्य शासनाकडे कोणताही प्रस्ताव प्रलंबित असेल, तर मुंबईत मी आहे... असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका प्रशासनाला दिला. शहरातील विविध विकासमांची यादीच घेऊन ते बैठकीला बसले होते. सर्व विकासकामे समजून घेत सुमारे अडीच तास अधिकाऱ्यांशी सकारात्मक चर्चा करीत अजित पवार यांनी शहरातील विकासकामांकडे बारीक लक्ष असल्याचे अधोरेखित केले.

दुसरीकडे, प्रशासकीय प्रमुख म्हणून महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी अजित पवार यांच्या प्रश्नांना अचूक उत्तरे दिली. त्यामुळे "साताराचे जिल्हाधिकारी असताना सिंह आणि मी एकत्र काम केले आहे...

मी प्रत्येक ठिकाणी चांगले अधिकारी देण्याचा प्रयत्न करीत असतो..." असे कौतूक करीत प्रशासनाला सकारात्मक ताकद देण्याची भूमिका अजित पवार यांची दिसली. राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेली ही बैठक शेखर सिंह यांनी एकहाती जिंकली.

याउलट, राष्ट्रवादीतील काही पदाधिकाऱ्यांनी "आयुक्त सोसायटी फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांना वेळ देतात. मात्र, आम्हाला वेळ देत नाहीत..." अशी तक्रार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अजित पवार यांनी प्रशासनाची बाजू घेत चुकीच्या कामाला मी विरोध करणार... काही चुकीचे झाले असेल, तर चौकशी केली जाईल, असे सांगत प्रशासनाची बाजू सावरण्याचा प्रयत्न केला.

### "विलास तू महेशशी जुळवून घे.." : अजित पवार

» **महापालिका भवनात झालेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बैठकीत माजी आमदार विलास लांडे यांचा दबदबा दिसला. लांडे यांनी भोसरी विधानसभा मतदार संघासह शहरातील विविध विकासकामे आणि वारेमाप खर्चाकडे लक्ष वेधले. तसेच, बैठकीनंतर पत्रकार परिषद घेण्याचे नियोजन नसतानाही लांडे यांच्या सूचनेमुळेच अजित पवार यांनी पत्रकार परिषद घेतल्याचे स्वत: जाहीर केले. विशेष म्हणजे, भोसरी मतदार संघातील विकासकामांबाबत बोलताना " विलास तू महेशसोबत जुळवून घे...मग, भोसरीतील कामे मार्गी लागतील..." असा सल्ला दिला. त्यामुळे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील 'शरद पवार' अशी ओळख असलेल्या विलास लांडे यांचा प्रभाव पुन्हा एकदा पहायला मिळाला.**

---

# चिखली, तळवडेतील समस्या मार्गी लावा!

## » माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील : आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

। पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी भोसरी विधानसभेचा नियोजित दौरा केला. विधानसभेतील शिवसेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक घेवून पक्ष बांधणी आणि संघटनेवर चर्चा केली. आढळराव पाटील यांनी पालिका आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेवून भोसरी विधानसभेतील समस्या आणि विकासकामे यावर चर्चा केली.**



पावसाचे दिवस असल्याने नागरिक आजारी पडण्याचे प्रमाण वाढले असल्याने त्यांना पालिका रुग्णालयात वेळेत आणि चांगले उपचार मिळावेत. रुपीनगर तळवडे रेड झोनमध्ये येत असला तरी तेथील नागरिकांना प्राथमिक सुविधा पालिकेकडून मिळाव्यात, अशी सूचना आढळराव पाटील यांनी पालिका आयुक्त शेखर सिंह यांना केली. या भागात पालिकेने आरक्षित जागा ताब्यात घ्याव्यात. त्यांचा विकास करावा, अशीही सूचना त्यांनी केली. भोसरी विधानसभेत समाविष्ट गावातील रस्त्यांची कामे त्वरित मार्गी लावावीत. चिखलीमध्ये नागरीकरण वाढले आहे. वाहतुकीसाठी रस्ते अपुरे पडतात, ट्रॅफिकचा त्रास नागरिकांना सहन करावा लागतो. त्यामुळे तेथील रस्त्यांचा विकास पालिकेने लवकर करावा. समस्त देशाचा स्वाभिमान छत्रपती संभाजी महाराज यांच्या पूर्णाकृती शिल्पाच्या कामाची माहिती त्यांनी घेतली व याच ठिकाणी संभाजी महाराज यांचा इतिहास येणाऱ्या प्रत्येक पिढीला आत्मसात करता येईल याचे रेखाटन करता येईल का ? यावर लक्ष देण्याची सूचना देखील त्यांनी केली. तसेच मोशी येथील हॉस्पिटल, बहुउद्देशीय स्टेडियम, नाशिक फाटा चांडोली कामाची माहिती पिंपरी चिंचवड मधील मराठी अनुदानित शाळांना प्रॉपर्टी टॅक्समध्ये सूट देण्यात यावी, अशा अनेक विषयांवर त्यांनी पालिका आयुक्तांबरोबर चर्चा केली.

### आयुक्तांच्या भेटी शिवसेनेचे पदाधिकारी...

» यावेळी कामगार नेते इरफानभाई सय्यद, जिल्हाप्रमुख भगवान पोखरकर, उपजिल्हा प्रमुख संभाजी शिरसाट, भोसरी विधानसभा प्रमुख दत्तात्रय भालेराव, उपशहर प्रमुख रामदास गाढवे, बळीराम जाधव, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख सुनील पवार, युवासेना उपजिल्हाप्रमुख अरुण जोगदंड, महिला विधानसभा प्रमुख मनीषा परांडे, विधानसभा संघटिका जानवी पवार, वाहतूक आघाडी प्रमुख मानसिंगराव जाधव, सुरेश सूर्यवंशी, संदीप जाधव, राहुल पिंगळे आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या सर्व शाखांमध्ये मराठी अनिवार्य

## » विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचा ठराव

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मराठी ही ज्ञानभाषा, उद्योगाची आणि रोजगाराची भाषा होण्यासाठी विद्यापीठीय स्तरावर शिकवल्या जाणाऱ्या सर्व विद्याशाखेत मराठी हा विषय अनिवार्य करण्याचा ठराव सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाच्या बैठकीत शुक्रवारी करण्यात आला. विद्यापीठ स्तरावर असा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.**

अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास मंडळाची बैठक विद्यापीठात झाली. या बैठकीला अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष डॉ. शिरीष लांडगे, सदस्य डॉ. सुधाकर शेलार, डॉ. प्रमोद आंबेकर, डॉ. शांताराम चौधरी, डॉ. पोर्णिमा घोडके, डॉ. सुरेश जाधव, राजीव बर्वे, डॉ. शीतल गोर्डे पाटील, डॉ. शोभा तितर, संजय ऐलवाड आदी उपस्थित होते. गेल्या काही वर्षांत शैक्षणिक आणि सामाजिक जीवनात मातृभाषेकडे दुर्लक्ष केल जात आहे.

त्यामुळे मराठी भाषा टिकवण्यासाठी, मराठी भाषेची व्याप्ती वाढवण्यासाठी महाविद्यालयीन, विद्यापीठीय स्तरावरील प्रत्येक विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकवली जावी. त्यामुळे ती ज्ञानभाषा होण्यासह



व्यवसायाची, उद्योगाची भाषा होण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. त्यानंतर सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव बैठकीत करण्यात आला. अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच तत्कालीन पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेसाठी झाली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव करण्यात आला. हा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील पहिलेच आहे. सर्व विद्याशाखांमध्ये मराठी शिकवल्यास मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल. तसेच मराठी भाषेत पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. केलेल्या तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मराठी अनिवार्य करण्याच्या मागणीसाठी कुलगुरूंसह राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

### मराठी अनिवार्य करण्याच्या मागणी

» अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात प्रादेशिक भाषांतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच तत्कालीन पुणे विद्यापीठाची स्थापना मराठी भाषेसाठी झाली होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्व विद्याशाखांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्याचा ठराव करण्यात आला. हा ठराव करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राज्यातील पहिलेच आहे. सर्व विद्याशाखांमध्ये मराठी शिकवल्यास मराठी भाषेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल. तसेच मराठी भाषेत पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. केलेल्या तरुणांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. मराठी अनिवार्य करण्याच्या मागणीसाठी कुलगुरूंसह राज्यपाल, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे.

भाषा भवनासाठीही प्रयत्न विद्यापीठात भाषा भवन उभारणीचे काम दीर्घ काळ प्रलंबित आहे. त्यामुळे भाषा भवनासाठीही प्रयत्न केले जाणार असल्याचे डॉ. सांगळे यांनी सांगितले.

# क्रिकेट स्टेडियमसाठी पुणे आदर्श ठरणार!

**। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन'च्या गहुंजे येथील स्टेडियमवर पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर करून तेच पाणी स्टेडियमसाठी पुन्हा वापरात आणले जाणार आहे. येथे राबविण्यात येणारे जल संवर्धनाचे हे मॉडेल देशभरातील क्रिकेट स्टेडियमसाठी आदर्श ठरणार आहे. मैदानासह आजूबाजूच्या ठिकाणी पावसाळी पाण्याचा पुनर्वापर करणारे देशातील हे पहिले क्रिकेट स्टेडियम ठरणार आहे.**

सध्या देशभरातील क्रिकेट, गोल्फच्या मैदानांसह इतर मोठ्या क्रीडांगणाच्या देखभालीसाठी मोठ्या प्रमाणावर लागणारे पाणी टँकरद्वारे अथवा बोअरवेलद्वारे जमिनीतून उपसा करून वापरले जाते. यामुळे कोट्यवधी लिटर पाणी वाया जात असल्याची याचिका काही महिन्यांपूर्वी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणासमोर (एनजीटी) होती. या प्रकरणी न्यायाधिकरणाने सर्व क्रिकेट स्टेडिअम, गोल्फ मैदानांच्या व्यवस्थापकांना जलसंवर्धन प्रकल्प राबविण्याचा आदेश दिला आहे. पावसाचे पाणी मुरविण्याबरोबरच, इतर कामांसाठी वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर बंधनकारक करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने पाणी फेरवापराचा निर्णय घेतला आहे. गहुंज्यातील स्टेडिअममध्ये पाण्याचा अल्पावधीत निचरा करून, त्यातील काही लाख लिटर पाणी मोठ्या टाकीत सोडण्याची व्यवस्था आहे. ही यंत्रणा अधिक व्यापक आणि अद्ययावत करून पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविण्याचा निर्णय मंडळाचे अध्यक्ष रोहित पवार, सचिव शुभेंद्र भांडारकर यांसह नव्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे. 'गहुंजे स्टेडिअम बांधतानाच जमिनीखाली पाइपलाइनचे जाळे उभारले आहे.

त्यामुळे मैदानावर पावसाचे पाणी अथवा पाणी फवारले, की अल्पावधीत सगळे पाणी जमिनीत मुरून पाइपद्वारे एका मोठ्या टाकीत भरले जाते. या पाण्याचा पुनर्वापर केला जातो. उन्हाळ्यातील काही महिने वगळल्यास टाकीतील पाणी आम्हाला पुरते. रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्पाची उभारणी करून आम्ही जलसंवर्धनाच्या दिशेने आणखी एक महत्त्वाचे पाऊल टाकत आहोत,' अशी माहिती 'एमसीए'चे सचिव शुभेंद्र भांडारकर यांनी दिली.



# कचरा डेपोसाठी पर्यायी जागेचा शोध!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश : वन विभागाच्या अन्य जागांची चाचपणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून मौजे पुनावळे येथे प्रस्तावित कचरा डेपोला स्थानिक नागरिक आणि सोसायटीधारकांनी तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे प्रशासनाने कचरा डेपोकरीता वन विभागाची पर्यायी जागा शोधावी. लोकांना त्रास होईल, अशी भूमिका घेवू नये. तसेच, किमान ५०० मीटर बफर झोन आणि वृक्षाच्छा भागात कचरा डेपो किंवा प्रकल्प विकसित करावा, असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.**



राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारमध्ये उपमुख्यमंत्रीपदी जबाबदारी घेतल्यानंतर अजित पवार यांनी पहिल्यांदाच पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. शहरातील राष्ट्रवादीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले. दरम्यान, शहरातील विविध प्रकल्पांबाबत महापालिका भवनामध्ये बैठक घेण्यात आले. यावेळी आमदार अण्णा बनसोडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी आमदार विलास लांडे, माजी शहराध्यक्ष संजोग वाघेरे, माजी महापौर योगेश बहल, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट, युवा नेते संदीप पवार आदी उपस्थित होते

अजित पवार म्हणाले की, पुनावळेतील कचरा डेपोबाबत स्थानिक नागरिकांनी माझ्याकडे निवेदन दिले आहे. कचरा डेपो लोकवस्तीच्या ठिकाणी करताना काळजी घेतली पाहिजे. पुनावळेतील प्रस्तावित जागेच्या भोवती मोठ्याप्रमाणात लोकवस्ती झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने पर्यायी जागेचा शोध घ्यावा. नागरिकांना त्रास होईल, असा प्रकल्प राबवू नये. तसेच, वन विभागाकडून नवीन जागेत आणि किमान ५०० मीटर बफर झोन राहील, अशी जागा निश्चित करावी.

### मागणीला यश...

**पुनावळेतील ग्रामस्थ आणि सोसायटीधारकांच्या प्रतिनिधींनी नुकतीच अजित पवार यांची मुंबईत भेट घेतली होती. स्थानिक लोकप्रतिनिधी चेतन भुजबळ, नवनाथ ढवळे यांनी याकामी पुढाकार घेतला. तसेच, सर्वपक्षीय नेत्यांना साकडे घातले होते. विशेष म्हणजे, "मी पुनावळेकर" ही मोहीमही सुरू केली होती. कचरा डेपोच्या भोवती किमान १५ हजार लोकवस्ती असून, सोसायटीधारकांना कचरा डेपो आणि दुर्गंधीचा त्रास होणार आहे. त्यामुळे कचरा डेपो अन्य ठिकाणी स्थलांतरीत करावा, अशी मागणी करण्यात आली होती. यावर सकारात्मक प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाला पर्याय शोधण्याचे निर्देश दिले आहेत.**

### ताथवडेतील शाळेचे हस्तांतराचा प्रश्न मार्गी...

**ताथवडे गावचा समावेश महापालिका हद्दीत २००९ मध्ये समावेश झाला आहे. मात्र, येथील जिल्हा परिषद शाळेचे हस्तांतरण झाले नाही. परिणामी, गोरगरिब कुटुंबातील विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधांपासून वंचित रहावे लागले होते. याबाबत युवा नेते संदीप पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले होते. यावरही महापालिका भवनातील बैठकीत चर्चा करण्यात आली. अजित पवार यांनी प्रशासनाला उचित कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यामुळे आयुक्त शेखर सिंह यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे तात्काळ संपर्क केला आणि शाळा आहे त्या परिस्थितीमध्ये हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत कार्यवाही सुरू केली. त्यामुळे गेल्या १३ वर्षांपासून प्रलंबित असलेला ताथवडेतील शाळा हस्तांतराचा प्रश्नही लवकरच मार्गी लागणार आहे.**


---

# पालकांनी नाकारले 'आरटीई'चे प्रवेश!

## शहरात 517 जागा रिक्त : पालकांची भूमिका 'शाळा चांगली नाही'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी'आरटीई' अंतर्गत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित जागांवर प्रवेश देणे शासन निर्णयानुसार बंधनकारक आहे. मात्र, काही पालकांकडूनच 'शाळा चांगली नाही' म्हणत प्रवेश नाकारल्याचे चित्र आहे. चक्क पाचव्या फेरीनंतरही ५१७ जागा रिक्त राहिल्या आहेत.**




आर्थिक दुर्बल मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी राज्य शासनाने शिक्षण हक्क कायदा अमलात आणला. त्यानुसार खासगी शाळांमध्ये मुलांना प्रवेश देणे सक्तीचे करण्यात आले.

पहिली ते आठवीच्या सर्व बालकांना खासगी विनाअनुदानित शाळेमध्ये मोफत शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. आर्थिक दुर्बल घटकांतील २५ टक्के आरक्षित जागा ठेवण्याचे निर्देश आहेत. परंतु, एप्रिलपासून ही प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही अद्याप अनेक शाळांनी मुलांना प्रवेश दिलेले नाहीत तर काही पालकांनीच मराठी माध्यमांची शाळा असल्याने सोडतीत नाव आलेल्या शाळांमध्ये प्रवेश घेतले नाहीत. 'आरटीई'तंर्गत पालकांच्या पाल्यांना पहिलीच्या वर्गासाठी २५ टक्के मोफत प्रवेश देण्यासाठी काढलेल्या ऑनलाइन सोडतीमध्ये ४ हजार ६४८ विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची लॉटरी लागली होती. मोफत प्रवेशासाठी अनेक वेळा मुदतवाढ देवूनही ३ हजार २८१ विद्यार्थ्यांपैकी केवळ २ हजार ७६४ विद्यार्थ्यांचे मोफत प्रवेश झाले. ५१७ विद्यार्थ्यांनी प्रवेश नाकारले. ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश नाकारले, जे प्रवेशासाठी शाळेकडे गेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांनी मोफत प्रवेशाची संधी गमावली आहे. उर्वरित प्रवेशासाठी दुसरी लॉटरी राज्यस्तरावरून निघणार आहे. त्यामुळे प्रतिक्षा यादीत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाची लॉटरी लागणार आहे.

### 517 जागा अद्याप रिक्त...

शहरात यंदा 'आरटीई' अंतर्गत १७४ शाळांची नोंदणी करण्यात आली. यामध्ये 'आरटीई'साठी ३ हजार २८१ जागा उपलब्ध होत्या. पाचव्या फेरीनंतर फक्त २२ जागांवर प्रवेश झाल्यानंतर ५१७ जागा अद्याप रिक्त आहेत. या शैक्षणिक वर्षासाठीचे २५ टक्के आरक्षित जागांसाठी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची पाचवी विशेष फेरी संपली आहे. अद्याप ४१ पालक प्रवेशासाठी फिरकले नाहीत.

> "शहरात 'आरटीई' अंतर्गत योग्य प्रकारे प्रवेश होत आहेत की, नाही याची माहिती आम्ही घेत आहोत. पालकांच्या काही तक्रारी असतील, तर आम्ही त्यांना मार्गदर्शन करतो. परंतु, आता पालकांनी प्रवेश नाकारले आहेत."
>
> **- संजय नाईकडे, प्रशासन अधिकारी.**




# फुटबॉलच्या मैदानातील विजेत्या..

**महिला फुटबॉलच्या विस्तारत्या विश्वाला यंदा नवा जगज्जेता (स्पेन) आणि उपविजेता (इंग्लंड) लाभला. परंतु तेवढ्यापुरतीच या स्पर्धेची नवलाई सीमित नाही. यंदाची विश्वचषक स्पर्धा जशी अधिक देशांमध्ये खेळली गेली, तसाच स्पर्धेचा आस्वाद घेणाऱ्या जगभरातील प्रेक्षकसंख्येतही अभूतपूर्व वाढ झालेली दिसून आली.**

या स्पर्धेत स्पेनने काहीसा अनपेक्षित विजय मिळवला. जर्मनी आणि स्पेन हे दोनच देश त्यामुळे पुरुष आणि महिला या दोन्ही विभागांमध्ये आजवर जगज्जेते ठरले आहेत. दोन देशांतील फुटबॉलची गुणवत्ता आणि लोकप्रियता यांची समन्यायी व्याप्ती यातून दिसून आली. प्रचंड गाजावाजा, विशेषत: इंग्लिश माध्यमांनी करूनही इंग्लंडला पुन्हा एकदा एखाद्या प्रमुख अजिंक्यपदापासून वंचित राहावे लागले. वास्तवाच्या तुलनेत अपिरिमित व्यस्त ठरणाऱ्या अपेक्षांच्या बोज्याखाली आपल्या खेळाडूंना किती काळ ठेवायचे, याचे भान इंग्लिश फुटबॉल माध्यमांना ज्या दिवशी येईल तो सुदिन! अर्थात इतर अनेक देशांच्या तुलनेत या दोन देशांमध्ये महिला फुटबॉलची लोकप्रियता अधिक आणि बाजारपेठ मोठी आहे. पुरुषांप्रमाणेच महिला फुटबॉलमध्येही या दोन लीगकडेच सर्वोत्तम फुटबॉलपटू सर्वाधिक आकृष्ट होतात. गतवर्षी महिलांच्या



युरोपीय चँपियन्स लीग अंतिम सामन्यासाठी विक्रमी ९२ हजार प्रेक्षकांनी मैदानात हजेरी लावली होती. ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडने संयुक्त यजमानपद भूषवलेल्या यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत प्रतिसामना सरासरी उपस्थिती ३० हजार होती. जवळपास २० लाख तिकिटे विकली गेली. जगभरात दूरचित्रवाणीवरून जवळपास २०० कोटी प्रेक्षकांनी ही स्पर्धा पाहिल्याचे काही अंदाज सांगतात. ही आकडेवारी एकाच वेळी थक्क आणि ऊर्जित करणारी ठरते.

निव्वळ विक्रमी आकडेवारी हे या स्पर्धेचे वैशिष्ट्य ठरत नाही. गतवर्षी कतारमध्ये झालेली पुरुष फुटबॉल विश्वचषक स्पर्धा कित्येक धक्क्यांमुळे रंजक ठरली होती. इतर प्रमुख खेळांपेक्षा फुटबॉलमध्ये प्रस्थापितांची मक्तेदारी अधिक. त्यामुळे स्पर्धेला निराळी खुमारी प्राप्त झाली. तेच यंदाच्या महिला विश्वचषक स्पर्धेबाबत म्हणता येईल. अमेरिका, जर्मनी, नॉर्वे आणि जपान या माजी विजेत्यांपैकी एकाही संघाला उपान्त्यपूर्व फेरीपलीकडे मजल मारता आली नाही. कोलंबिया, मोरोक्को, दक्षिण कोरिया, नायजेरिया, यजमान ऑस्ट्रेलिया या देशांनी अनेक धक्कादायक निकाल नोंदवले. पुरुषांप्रमाणेच महिला फुटबॉलमध्येही प्रगती करणाऱ्या जपानने साखळी टप्प्यात स्पेनचा '४-०' असा धुव्वा उडवला. तरी या धक्क्यातून सावरून स्पेनने चिकाटीने अंतिम फेरी गाठून अखेर चषकही जिंकला. दोन वेळच्या विजेत्या अमेरिकेला यंदा फारसा प्रभाव पाडता आला नाही आणि यंदा प्रथमच त्यांना रित्या हातांनी परतावे लागले. १९९१मध्ये या स्पर्धेला प्रथम सुरुवात झाली, त्यावेळी अवघे १२ संघ खेळले. यंदाच्या स्पर्धेत ३२ संघांनी भाग घेतला. भाराभर संघांमुळे स्पर्धेचा दर्जा घसरेल, असा नकारसूर आळवणाऱ्यांचे अंदाज सपशेल खोटे ठरले. अर्थात स्पर्धा यशस्वी ठरणे हा एका प्रदीर्घ प्रवासातील केवळ एक टप्पा आहे. पुरुषी वर्चस्ववाद आणि लिंगभेदाधारित मानसिकतेचा सामना आजही महिला फुटबॉलपटू आणि खेळाडूंना करावा लागतोच. स्पेनच्या विजेत्या संघातील एकीबरोबर त्या देशातील फुटबॉल संघटनेच्या प्रमुखांनी अभिनंदन करण्याच्या नावाखाली गैरप्रकार केला, तो त्या क्षणी सहन करण्यापलीकडे ती खेळाडू काही करू शकली नव्हती. आता त्याबद्दल संबंधित पदाधिकाऱ्याला जाब विचारला जातो हा भाग वेगळा. जगातील एका अग्रणी क्रीडासाहित्य निर्मात्या कंपनीने इंग्लिश गोलरक्षक मेरी एर्प्सची जर्सी फ्रँचायझी बाजारात विक्रीस आणण्यास नकार दिला. 'गोलकीपरची जर्सी कोण विकत घेणार' असा उद्दाम सवाल कंपनीतर्फे उपस्थित करण्यात आला. एर्प्स या स्पर्धेतली सर्वोत्कृष्ट गोलरक्षक ठरली आणि तिचे नाव आणि क्रमांक असलेली जर्सी आज इंग्लंडमध्ये तडाखेबंद विकली जात आहे! व्यवस्थाचालकांची मानसिकता अजूनही कशी बदललेली नाही याची ही दोन उदाहरणे. फुटबॉलसारख्या खेळामध्ये मैदान व क्रीडासाहित्याबाबत महिलांसाठी निराळे मानक आणि आकार असावेत का, याची चर्चा या स्पर्धेच्या निमित्ताने सुरू झाली, तिचे स्वागत. महिला फुटबॉल सामन्यांना प्रेक्षक मिळत नाहीत, हा समज या स्पर्धेच्या निमित्ताने पुन्हा एकदा तथ्यहीन ठरला.

## संपादकीय »

### शैक्षणिक विस्तार !

***देशातील सव्वा लाख एकशिक्षकी शाळांत 'विविध विषयांचे पर्याय' कसे देणार अथवा दोन परीक्षा हे परीक्षेच्या ताणावर उत्तर कसे, याची उत्तरे धोरणात नाहीत..***

आपण काही वेगळे, काळावर ठसा उमटवून जाईल असे करून जावे असे प्रत्येक सत्ताधीशास वाटणे साहजिक. त्यात गैर काही नाही. तथापि हे असे काही करण्यासाठी ही मंडळी शैक्षणिक क्षेत्रालाच का हात घालतात हा प्रश्न पडतो. बरे काही करण्यासाठी इतके काही असताना ते सर्व सोडून यांचे लक्ष्य शिक्षण क्षेत्रावर. मग तो परीक्षाशून्य शिक्षणाचा प्रयोग असो वा दप्तरांचे ओझे कमी करण्याचा प्रयत्न असो. या नव्या शैक्षणिक धोरणाच्या अध्ययनामुळे चौदा विद्या, चौसष्ट कलांमध्ये पारंगत निपजलेल्या भारतवर्षातील नव्या पिढीस नोकरी, रोजगारासाठी समस्त जग पायघड्या घालेल. इतकेच नाही; तर हे शैक्षणिक धोरण आपल्या विद्यार्थ्यांस आणखी एक स्वप्न दाखवते. त्यानुसार यापुढे आपले विद्यार्थी निव्वळ ज्ञानार्जनाच्या किंवा ज्ञानवर्धनाच्या हेतूने शाळा, महाविद्यालयांत जातील आणि आवडेल ते, झेपेल तेवढे शिकूनही त्यांस पोट भरण्याची मुभा असेल.

**आपल्यापैकी बहुतेकांनी कृष्णाच्या वेशातला मुलगा आणि बुरख्यातली मुस्लीम आई हे फोटो पाहिले असणार. काही वेळा मुलाऐवजी मुलगीही दिसते, राधेच्या वेशात. अशा फोटोंवर हमखास लिहिलेलं असतं – 'इनक्रेडिबल इंडिया', 'अद्भुत भारत', 'हा माझा भारत देश!' अशा फोटोस्टोरीमुळे बहुतेकांच्या भावना उचंबळून येतात. पाहणाऱ्याचा राष्ट्राभिमान जागा होतो (म्हणे).**

# अपप्रचार रोखणारी माध्यमं होऊ या!

आता समजा, कृष्णाच्या जागी, ख्रिस्त किंवा प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या वेशातील मुलगा आणि आईच्या जागी मुस्लीम स्त्रीऐवजी हिंदू, ख्रिश्चन, शीख किंवा इतर कुणी स्त्री असती तर? आपण तेव्हाही जाऊ ना तितकंच भारावून? करूयात का यावर थोडा विचार? हाही विचार करूयात की असे फोटो का दिसत नाहीत? दरवर्षी वारीत, 'वारकऱ्यांना पाणी/खाऊ वाटणारे 'मुस्लीम' बांधव' किंवा 'वारकऱ्यांसाठी मुस्लीम बांधवांनी मशीद केली खुली' अशा मथळ्यांसह प्रसिद्ध होणारे फोटो आणि बातम्या आपण पाहतो. कोविड-१९ च्या काळात 'प्लाझ्मा डोनेट करून मुस्लीम बांधवानं वाचवले प्राण' या टायपाच्या बातम्या आल्या. कधीतरी अधनंमधनं 'अमुक मुस्लीम बांधवानं तमुक हिंदू व्यक्तीला दिली किडनी/डोळे/हृदय' इत्यादी बातम्या येतात. अशा बातम्यांचा उद्देश सौहार्द दाखवणं आणि मुस्लीम समूहाचं सकारात्मक चित्रण करण्याचा असतो (म्हणे).



वरच्या परिच्छेदात एका शब्दाची पुनरावृत्ती आहे. बांधव! मुस्लीम समाजाविषयीच्या बातम्यांमध्ये 'बांधव' शब्द का असतो? माध्यमांना इतर जाती-धर्माविषयीच्या बातम्या देताना बंधुत्वाची भावना का नाही आठवत? बातम्यांमध्ये अन्य जाती-धर्माचा उल्लेख समाज म्हणून केला जातो किंवा केलाही जात नाही. मग मुस्लीम धर्मालाच असं अधोरेखित करून का मांडलं जातं? हा भेदभाव कशासाठी? वर उदाहरणादाखल उल्लेख केलेल्या या घटना 'बातम्या' कशा होऊ शकतात हा मला नेहमी पडणारा प्रश्न. या बातम्यांमधून धर्म वजा केल्यास त्यांचं बातमीमूल्य संपुष्टात येतं, पण ते लक्षात कोण घेणार? आपल्या गावबांधावरून चालत निघालेल्या वाटाड्यांच्या तहान-भूक, निवासाची काळजी करणं ही हे माणुसकीचं मूल्य आहे. कुणा आजारी माणसाच्या कामी येणं हा अतिशय चांगुलपणाचा भाव आहे. याचा आणि धर्माचा संबंध कुठं येतो? नीतिमत्तेच्या, मूल्यव्यवस्थेच्या बातम्या देताना धर्मावर इतका प्रकाशझोत कशासाठी टाकावा लागतो? नीतिमूल्य ही विशिष्ट धर्माची मक्तेदारी मुळीच नाही. (की आहे?) उलटपक्षी नीतिव्यवस्था ही सर्वच धर्माचा आधारस्तंभ आहे. खोटं बोलू नये, फसवू नये, हिंसा करू नये, कुणाशी वाईट वागू नये इत्यादी साधी ती नीतिमूल्ये. नीतिमत्तेचं धर्माशिवाय काही अडत नाही, पण धर्मसंस्थेला नीतिमूल्यांचा प्रचार करूनच स्वत:चा खुट्टा बळकट करावा लागतो. म्हणून तर सगळेच धर्म मुळात चांगले असतात (म्हणे). एकमेकांना मदत करणं, परस्परांच्या कामी येणं, अडचणी सोडवणं हा माणसाचा सहजभाव आहे. मग ते विशिष्ट समाजासाठी ठळक का करावं लागतं?

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राष्ट्रवादीमध्ये फूट पडली नाही!

## » शरद पवारांच्या घूमजाव वक्तव्य : कार्यकर्ते संभ्रमात

। वाळवा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते असल्याचे वक्तव्य करणारे शरद पवार यांनी दुपारी मात्र, घुमजाव केले. मी तसे बोललेलो नाही तर सुप्रिया सुळे तशा म्हणाल्या असल्याचे शरद पवार यांनी दुपारी सांगितले. सकाळी अजित पवार हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते असलेले शरद पवार यांचे वक्तव्य राज्यभर चर्चेचा विषय झाला होता.**

मात्र, आपल्याच वक्तव्यावर दुपारी शरद पवारांनी घुमजाव केले. त्यामुळे कायम संभ्रम ठेवणाऱ्या शरद पवारांच्या भुमिकेवरील संभ्रम आणखीनच वाढला आहे. माध्यमांशी बोलताना शरद पवार यांनी दोन्ही वक्तव्य केले आहेत. त्यामुळे हा संभ्रम आणखीनच वाढला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली नाही. तसेच अजित पवार हे आमचे नेते असल्याचे म्हणालो नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. पक्षातील काही लोकांनी दुसरी भूमिका घेतली, त्यांनी पक्ष सोडला तर त्याला पक्षात फूट पडली असे म्हणता येत नाही. असेही शरद पवार यांनी स्पष्ट केले. ज्याना जायचे होते, त्यांनी नवीन मार्ग स्वीकारला असेल, तर त्याला फूट पडली असे म्हणता येत नसल्याचेही ते म्हणाले. सुप्रिया सुळे, अजित पवार आमच्याच पक्षाचे नेते आहेत, त्यात काही वादच नाही. फूट पडणे याचा अर्थ काय? पक्षात फूट कधी होते, जर पक्षातच एक मोठा वर्ग वेगळा झाला तर, आज तशी स्थिती येथे नाही. असे वक्तव्य शरद पवार यांनी केले होते. यावर राज्यभरातून प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. यावरुन अनेक राजकीय अर्थ काढले जात होते. पहाटेच्या शपथ विधी नंतर एकदा संधी दिली होती. आता त्यांनी संधी मागायची नाही तर आम्ही देखील त्यांना संधी द्यायची नाही, अशी आमची भूमिका असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. आता त्यांना संधी द्यायची नसते, असेही त्यांनी स्पष्ट केले. अजित पवार आमचेच नेते आहेत, या शरद पवारांच्या वक्तव्यावर अजित पवार यांनी 'नो कॉमेंट्स' अशी प्रतिक्रीया दिली आहे. तसेच, मला या विषयावर काहीच बोलायचे नाही. तुम्ही सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर विचारा ना, असे आवाहनच पत्रकारांना केले. सुप्रिया सुळे, अजित पवार आमच्याच पक्षाचे नेते आहेत, त्यात काही वादच नाही. फूट पडणे याचा अर्थ काय? पक्षात फूट कधी होते, जर पक्षातच एक मोठा वर्ग वेगळा झाला तर, आज तशी स्थिती येथे नाही. असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पुन्हा एकदा संभ्रमात टाकणारे वक्तव्य केले आहे. त्यांच्या वक्तव्याचे अनेक अर्थ लावले जात आहे. शरद पवारांचा अजित पवारांचा छुपा पाठिंबा आहे, या आरोपावरही यामुळे पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. राष्ट्रवादी पक्ष फोडण्याचा भाजपचा हा पहिलाच प्रयत्न नाही. याआधीही भाजपने तीन वेळा राष्ट्रवादी पक्ष फोडण्याचा प्रयत्न केला, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, राष्ट्रवादी फोडण्याचा भाजपने यापूर्वीही दोनदा प्रयोग केला आहे.



### आता अजित पवारांना संधी नाही

» पहाटेच्या शपथ विधी नंतर एकदा संधी दिली होती. आता त्यांनी संधी मागायची नाही तर आम्ही देखील त्यांना संधी द्यायची नाही, अशी आमची भूमिका असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. आता त्यांना संधी द्यायची नसते, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# राष्ट्रवादीमध्ये फूट पडली आहे !

## » आम्ही शरद पवार यांच्याशी चर्चा करतो : राऊत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजित पवार गटाने शरद पवारांची हकालपट्टी केली, याचा अर्थ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली असा होतो, असे वक्तव्य संजय राऊत यांनी केले आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, भाजपसोबत हातमिळवणी केली, हा पक्षद्रोह आहे. त्यामुळे आम्ही त्यांची हकालपट्टी केली.**

त्याचपद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेसमधून एक गट फुटला आणि पक्षाच्या विचारधारेविरोधात भाजपशी हातमिळवणी केली. त्यानंतर त्या पक्षाने अजित पवारांसह काही प्रमुख लोकांची हकालपट्टी केली. याला फूट नाही म्हणायचे तर काय म्हणायचे? फूट आहे. दरम्यान ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे की नाही, हे या राज्याच्या जनतेने ठरवावे. माझ्या माहितीप्रमाणे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. जशी शिवसेनेत फूटून एक गट वेगळा झाला आणि पक्षाची भूमिका, पक्षप्रमुखांचा विचार बाजूला ठेवून त्यांनी भाजपसोबत हातमिळवणी केली हा पक्षद्रोह आहे. त्याच्यामुळे आम्ही त्यांची हकालपट्टी केली. ही फूट आहे. त्याच पद्धतीने राष्ट्रवादी काँग्रेसमधून एक गट फुटला आणि पक्षाच्या विचारधारेविरुद्ध भाजपशी हातमिळवणी केली. त्यानंतर त्यापक्षाने अजित पवार यांच्यासह प्रमुख नेत्यांची हकालपट्टी केली. याला फूट नाही म्हणायचे तर काय म्हणायचे? ही फूट आहे, असे संजय राऊत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. संजय राऊत म्हणाले की, या राज्यात राष्ट्रवादीचे दोन अध्यक्ष आहेत एक जयंत पाटील, दुसरे सुनील तटकरे.

ही फूट नाही का? अजित पवार गटाने शरद पवार यांची अध्यक्ष पदावरून हकालपट्टी केली आहे हे आपल्याला माहीत असेल. याला आम्ही फूट मानतो. लोकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही. लोकांनी ठरवलेले आहे की राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडलेली आहे. एका गटाने भाजपसोबत ईडीच्या भितीने हातमिळवणी केली. स्वत: शरद पवार आणि त्यांना मानणारा वैचारिक वर्ग आहे, तो मोठा गट महाविकास आघाडीत आहे. संजय राऊत म्हणाले की, आम्ही राज्यात आणि देशात भाजपला पराभूत करायचे ठरवले आहे.



### पवारांना मानणारा वर्ग मविआसोबत

» संजय राऊत म्हणाले की, या राज्यात राष्ट्रवादीचे दोन अध्यक्ष आहेत एक जयंत पाटील, दुसरे सुनील तटकरे. ही फूट नाही का? अजित पवार गटाने शरद पवार यांची अध्यक्ष पदावरून हकालपट्टी केली आहे हे आपल्याला माहीत असेल. याला आम्ही फूट मानतो. लोकांच्या मनात कोणताही संभ्रम नाही. लोकांनी ठरवलेले आहे की राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडलेली आहे. एका गटाने भाजपसोबत ईडीच्या भितीने हातमिळवणी केली. स्वत: शरद पवार आणि त्यांना मानणारा वैचारिक वर्ग आहे, तो मोठा गट महाविकास आघाडीत आहे.

# 16 ठिकाणी नाफेडची कांदा खरेदी केंद्र सुरु

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

राज्यात आतापर्यंत एकूण 16 ठिकाणी नाफेड कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात आली असल्याची माहिती केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांना दिली आहे. नाशिक जिल्ह्यात नाफेड कांदा खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत आज मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. लासलगाव, पिंपळगाव बसवंत, विंचूर, अंदरसूल, मुंगसे, ताराबाद, नामपूर, मालेगाव, मनमाड, देवळा येथे खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असून उद्या येवल्यात नाफेड कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार आहे.

त्यानुसार राज्यात आता एकूण 16 ठिकाणी नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु असणार आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने नाफेडच्या माध्यमातून 2410 रुपयांनी 2 लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करत आहे.

यासाठी राज्यात लासलगाव, विंचूर, अंदरसूल, पिंपळगाव बसवंत, मुंगसे, ताराबाद, नामपूर, मालेगाव, मनमाड, देवळा, तिसगाव, वैजापूर, आगर, पारनेर, व अहमदनगर येथे नाफेडच्या माध्यमातून कांदा खरेदी करण्यात येत आहे.ही केंद्रांची संख्या अधिक वाढविण्यात यावी याबाबत आज मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याशी तसेच नाफेडचे व्यवस्थापक निखिल पाडाडे यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा केली. त्यानुसार उद्यापासून येवल्यात नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु करण्यात येणार असून राज्यात 16 ठिकाणी नाफेडच्या वतीने कांदा खरेदी केंद्र सुरु झाली आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# मोदींना ग्रीसचा दुसरा सर्वोच्च सन्मान!

## » 2030 पर्यंत द्विपक्षीय करार दुप्पट करू : पंतप्रधान

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी एक दिवसीय ग्रीस दौऱ्यावर आहेत. दोन्ही देशांमध्ये शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा येथे झाली. यानंतर संयुक्त निवेदनात पंतप्रधान म्हणाले - आम्ही एकमेकांना जुन्या मित्रांप्रमाणे समजून घेतो. आम्ही 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करू. ग्रीसमधील जंगलात लागलेल्या आगीत प्राण गमावलेल्या लोकांना पंतप्रधानांनी श्रद्धांजली वाहिली. त्याचवेळी राष्ट्राध्यक्ष कतरिना साकेलारोपौलो यांनी पंतप्रधान मोदींचे औपचारिक स्वागत केले .**



त्यांना ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ ऑनर हा ग्रीसचा दुसरा सर्वोच्च सन्मान देण्यात आला. मोदी म्हणाले- या सन्मानासाठी मी राष्ट्रपती, सरकार आणि ग्रीसच्या जनतेचे आभार मानतो. यावरून ग्रीसच्या लोकांचा भारताप्रति असलेला आदर दिसून येतो. ग्रीसचे पंतप्रधान म्हणाले- मोदी माझे मित्र आहेत. असे म्हटले जाते की 1+1 = 11 देखील होतात. येथे आपल्याला दोन्ही देशांमधील मैत्रीचे उदाहरण मांडायचे आहे. जर एक देश जगातील सर्वात मोठी लोकशाही असेल, तर दुसरा देश जगातील पहिली लोकशाही आहे. चांद्रयान-3 मोहिमेच्या यशाबद्दल भारताचे अभिनंदन. यानंतर पंतप्रधान मोदी म्हणाले - दोन्ही देशांमध्ये ऐतिहासिक संबंध आहेत. काळाच्या गरजेनुसार आपण संरक्षण, सुरक्षा, पायाभूत सुविधा, शिक्षण आणि कौशल्य विकास यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात एकत्र काम करू शकतो. दोन्ही देशांदरम्यान एनएसए स्तरावरील चर्चाही सुरू होणार आहे.40 वर्षांनंतर भारतीय पंतप्रधान ग्रीसला भेट देत आहेत. यापूर्वी 1983 मध्ये इंदिरा गांधी ग्रीसला गेल्या होत्या.

ग्रीक सिटी टाईम्सच्या वृत्तानुसार, पीएम मोदींसोबत 12 भारतीय उद्योगपतीही अथेन्सला पोहोचले आहेत. त्यांची ग्रीसमधील एका व्यावसायिकाशी बैठक होईल. दोन्ही देशांमधील व्यापार, तंत्रज्ञानापासून संरक्षण सहकार्यापर्यंत चर्चा होणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, ग्रीस अनेक दिवसांपासून भारताचे ब्रह्मोस क्रूझ मिसाइल खरेदी करण्यात रस दाखवत आहे. अशा परिस्थितीत भारताचे ब्रह्मास्त्र म्हटल्या जाणाऱ्या ब्रह्मोस क्षेपणास्त्रासाठी पंतप्रधान मोदींच्या ग्रीस दौऱ्यावर करार होऊ शकतो.

काश्मीर प्रश्नावर भारताच्या विरोधात जाऊन तुर्किये पाकिस्तानला पाठिंबा देत आहे. एवढेच नाही तर पाकिस्तान आणि इराण वेगाने संरक्षण भागीदारी वाढवत आहेत. एप्रिल 2023 मध्ये तुर्कीने पाकिस्तानला बायरक्तार टीबी2 ड्रोन दिले. या ड्रोनने रशिया-युक्रेन युद्धात आपली क्षमता सिद्ध केली आहे. पाकिस्तानला हे ड्रोन मिळणे हे भारतासाठी धोक्यापेक्षा कमी नाही. पाक-तुर्की युती तोडण्यासाठी भारतीय हवाई दलाचे प्रमुख व्हीआर चौधरी गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात ग्रीसला गेले होते. दरम्यान, ड्रोन तंत्रज्ञानावर काम करण्यासाठी दोन्ही देशांमध्ये चर्चा झाली. वास्तविक, ड्रोनचा धोका पाहता तुर्कियेचा शत्रू ग्रीस आता भारताला साथ देण्याच्या तयारीत आहे. या ड्रोनच्या रडारशी संबंधित महत्त्वाचा डेटा ग्रीस भारतासोबत शेअर करू शकतो. बर्याक्तार ड्रोनचा आकार लहान असल्याने त्यांना रडारवर शोधणे अवघड आहे. अशा परिस्थितीत भारतासोबत शेअर केलेली माहिती खूप महत्त्वाची ठरणार आहे. त्या बदल्यात भारत ग्रीसला ब्रह्मोस देऊ शकतो. एका मुलाखतीदरम्यान, ब्रह्मोस एरोस्पेसचे सीईओ आणि एमडी अतुल दिनकर यांनी सांगितले होते की, भारताने ब्राह्मोसची विक्री करण्यासाठी फिलिपाइन्सच्या संरक्षण मंत्रालयाशी पहिला करार केला आहे. याशिवाय अनेक नाटो देशांनी ते खरेदी करण्यात रस दाखवला आहे.

### तुर्कियेच्या विरोधात जाऊन ग्रीसला पाठिंबा

» एजियन समुद्राबाबत ग्रीस आणि तुर्किये यांच्यात तणाव कायम आहे. याशिवाय सायप्रस बेटाच्या विभाजनाबाबतही दोन नाटो देशांमध्ये वाद आहे. हा वाद 1974 चा आहे. ग्रीस-समर्थित लष्करी उठावाला प्रत्युत्तर म्हणून तुर्कियेच्या सैनिकांनी या बेटावर आक्रमण केले. नंतर, व्यापलेल्या क्षेत्राला तुर्कियेने उत्तर सायप्रसचे तुर्की प्रजासत्ताक असे नाव दिले. तुर्किये हा देश होण्यापूर्वीपासून ग्रीक आणि तुर्क यांच्यात वैमनस्यचा मोठा इतिहास होता. या मुद्द्यावर भारताने नेहमीच ग्रीसला पाठिंबा दिला आहे. त्याचबरोबर ग्रीसनेही काश्मीर प्रश्नावर भारताला पाठिंबा दिला आहे. ग्रीस देखील मध्ये भारताच्या स्थायी जागेचा समर्थक आहे

# चीनने लडाखची जमीन बळकावली!

## » मोदी-जिनपिंग भेटीनंतर राहुल गांधींची सरकारवर टीका

**। नवी दिल्ली ।**

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**मोदी आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे ब्रिक्स शिखर परिषदेच्या अखेरच्या (गुरुवार, २४ ऑगस्ट) दिवशी काही क्षण संवाद साधला. या बातमीनंतर काँग्रेसचे नेते राहुल गांधी शुक्रवारी (ता. २५) केंद्र सरकारवर टीका करीत चीन सीमावादाच्या विषयाला पुन्हा तोंड फोडले. चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीने भारताची जमीन बळकावली असल्याचा आरोप गांधी यांनी केला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी ‘लडाखमधील एक इंचही जमीन चीनने ताब्यात घेतली नसल्याचे’ धडधडीत खोटे सांगत असल्याचेही ते म्हणाले. “लडाख हे सैनिकी डावपेचाच्या अनुषंगाने मोक्याचे ठिकाण आहे. चीनने भारताची जमीन गिळंकृत केली, ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे. मात्र, विरोधी पक्षांच्या बैठकीत मोदी सांगतात की, चीनने लडाखमधील एक इंचही जमीन ताब्यात घेतलेली नाही. हे साफ खोटे आहे.”, अशी प्रतिक्रिया राहुल गांधी यांनी माध्यमांशी बोलताना दिली. मागच्या आठवड्यात राहुल गांधी यांनी काही दिवस लडाखचा दौरा केला. गांधी यांनी लडाख ते कारगिल, असा दौरा मोटरसायकलवरून केला आहे. आज त्यांच्या दौऱ्याचा शेवटचा दिवस असून, कारगिल युद्धातील वीर जवानांच्या स्मरणार्थ ‘कारगिल शहीद स्मारक’ येथे ते पुष्पहार अर्पण करतील. कारगिलहून श्रीनगर येथे परतत असताना द्रास येथे ते स्थानिक लोकांशी संवाद साधण्यासाठी थांबणार आहेत. राहुल गांधी यांनी काही महिन्यांपूर्वी कन्याकुमारी ते काश्मीरपर्यंत भारत जोडो ही पदयात्रा काढली होती. श्रीनगर येथे या पदयात्रेची समाप्ती करण्यात आली. त्यानंतर आता श्रीनगरच्या वरच्या भागात गांधी यांनी वेगळ्या पद्धतीने दौरा केला आहे.

“भारत आणि चीनचे संबंध सुधारण्यासाठी लडाखच्या प्रत्यक्ष नियंत्रणरेषेवर शांतता प्रस्थापित होणे गरजेचे आहे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांना केले”, अशी माहिती भारताचे परराष्ट्र सचिव विनय ख्वात्रा यांनी गुरुवारी माध्यमांना दिली. चीनकडून उभय नेत्यांमधील या संवादाचे वर्णन ‘प्रामाणिक आणि सखोल’ असे करण्यात आले. राहुल गांधी यांनी ‘भारत जोडो’ यात्रेची माहिती लडाख येथे दिली. ते म्हणाले, “काही महिन्यांपूर्वी आम्ही कन्याकुमारी ते काश्मीर, असा प्रवास केला; त्याला भारत जोडो यात्रा असे नाव दिले.

### लडाखमधील हा पहिलाच दौरा

» दोन दिवसांत पक्षाचा कोणताही नेता त्यांना भेटणार नाही किंवा त्यांच्याकडून कोणतीही राजकीय बैठक घेतली जाणार नाही. राहुल गांधी १७ ऑगस्ट रोजी लडाख येथे आले. जम्मू आणि काश्मीरला केंद्रशासित प्रदेश घोषित केल्यानंतरचा त्यांचा लडाखमधील हा पहिलाच दौरा आहे. ऑगस्ट २०१९ रोजी केंद्र सरकारने जम्मू आणि काश्मीरला विशेष प्रावधान देणारे कलम ३७० काढून टाकल्यानंतर या प्रदेशांना केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित केले होते. मागच्या सात दिवसांत राहुल गांधी यांनी लडाखमधील अनेक लोकप्रिय ठिकाणांना भेटी दिल्या.

# आयुषमान इतका बहुरंगी!



रडवणं सोपं पण हसवणं त्यापेक्षा कठीण म्हटलं जातं. काही करुन हसवणंही अवघडच. सहजगत्या आलेलं हसू मनावरचं दडपण दूर करतं. तुम्हाला फ्रेश करुन जातं. आपण समोर जे पाहतो आहोत त्यात तर्काचा भाग अजिबात नाही हे माहिती असून सुद्धा परिस्थितीमुळे निर्माण होणारा विनोद आपल्याला खळखळून हसवतो तर आपण त्याचा आनंद घेणं जास्त महत्वाचं.बऱ्याचदा समोर असणाऱ्या घटनेतील तर्काचा शोध घेण्यापेक्षा त्यातील विनोदाच्या आनंदापासून आपण दूर राहतो. बाकीचे पोट धरून हसू लागतात. ते का हसत आहेत हे पाहून आपल्याला आश्चर्य वाटू लागते. त्यात फार आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. आपण अति चिकित्सकदृष्टीनं त्या घटनेकडे पाहिल्यानं त्यातील विनोद संपून जातो. हाती येते कमालीची निराशा आणि निरसता.तुम्हाला आयुषमान खुराणाचा ड्रीम गर्ल २ पाहायचा आहे का, मग एक गोष्ट करा थोडा तुमचा लॉजिकल स्वभाव बाजूला ठेवून जा. आणि मग बघा हा चित्रपट तुम्हाला किती फ्रेश करतो ते. त्याला तुमच्याकडून फक्त टाळ्या, शिट्यांची अपेक्षा आहे. ड्रीम गर्लमध्ये आयुषमाननं पूजा नावाच्या मुलीची भूमिका साकारली आहे. यापूर्वी देखील त्यानं ड्रीम गर्ल १ मध्ये साकारलेली पूजा खूपच लोकप्रिय ठरली होती. आयुषमाननं पुन्हा एकदा तो किती ताकदीचा अभिनेता आहे हे त्यानं दाखवून दिलं आहे. करम चौधरीची गोष्टच वेगळी आहे. त्याला खूप मोठं व्हायचं आहे, पण मेहनत करण्याची त्याची फारशी ताकद नाही. त्याचं परीवर (अनन्या पांडे) जीवापाड प्रेम आहे. ती एका शहरातील एका मोठ्या वकीलाची मुलगी आहे. परी देखील वकील आहे.

# गौतमी सोशल मीडियावर चर्चेत!



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री गौतमी देशपांडे ही सोशल मीडियावर चर्चेत राहणारी अभिनेत्री आहे. गौतमी देशपांडेला आपण आजवर अनेक मालिका आणि सिनेमांमधून पाहिलंय. 'झी-मराठी'वरील 'माझा होशील ना' या मालिकेतून तर ती घराघरात पोहोचलेली आहे.अभिनेत्री गौतमी देशपांडे हल्ली चर्चेत असते ते तिच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळे. ती सध्या रिल्स मुळे सोशल मिडियावर प्रचंड सक्रिय असते. गौतमी आणि मृण्मयी या दोघी बहिणी सतत काहीतरी नवीन पोस्ट करत असतात. मात्र आज गौतमी ही तिच्या इंस्टास्टोरीमुळे चर्चेत आली आहे. तिचे पैसे कुणीतरी अडकवले आहेत. तिने काम केले मात्र त्याच मानधन तिला अजूनही मिळालेलं नाही. बऱ्याचवेळा विचारणा करुनही काही फायदा न झाल्यानं गौतमीने आता थेट इंस्टाला स्टोरी टाकत याबाबत विचारणा केली आहे. गौतमीने व्हास्टअॅप चॅटचा एक स्क्रीनशॉट शेअर केला आहे. यात गौतमीने सुरुवातीला समोरच्या व्यक्तीला पैसे ट्रान्सफर केले का? याबाबत विचारणा केली आहे. तर त्या व्यक्तीनेही 'थांबा, चेक करते' असं उत्तर दिले आहे. यानंतरही तिला तिचे पैसे मिळालेले नाही त्यानंतर गौतमीने पुन्हा मेसेज केला आहे ज्यात ती लिहिते की, मी तुमच्याकडे अनेक वेळा पाठपुरावा करण्याचा प्रयत्न केला. कलाकाराला एकाच गोष्टीसाठी इतक्या वेळा पाठपुरावा करावा लागतो हे खरोखरच दुर्दैवी आहे. सोमवारपर्यंत माझे पैसे ट्रान्सफर करा' हा मेसेज केल्यानंतर समोरील व्यक्तीने तिला साधा रिप्लायही दिलेला नाही. त्यामुळे तिने दुसऱ्यादिवशी पुन्हा मेसेज केला आहे ज्यात तिने लिहिले आहे की, तुम्ही पण उत्तर देऊ शकत नाही का? जर तुमच्याकडे मेसेजचे उत्तर देण्या इतकंही सौजन्य नसेल तर मी हे सगळं इंस्टाग्रामवर टाकते आहे.आता गौतमीने हा स्क्रिन शॉट सोशल मीडियावर शेयर केला आहे. हा फोटो शेयर करत तिने लिहिलं की, "जेव्हा प्रश्न पैशांचा येतो...तेव्हा ही लोक अशी वागतात. मला यावेळी खरंच खूप वाईट वाटतंय. आपण काम करतो आणि त्याचा मोबदला आपल्याला असा मिळतो. स्वत:च्या पैशांसाठी आपल्यालाचा असा पाठपुरावा करावा लागतो. गौतमीने फक्त स्क्रिनशॉट टाकला आहे. यात तिने कुणाचेच नाव घेतलेले नाही किंवा कुणालाही टॅग केलेले नाही. तिने फक्त तिला तिच्या कामाचा मोबदला देण्यात यावा यासाठी ही पोस्ट शेयर करत मागणी केली आहे. जेव्हा एखादी मेहनत घेतो आणि काम करतो मात्र त्याचा योग्य मोबदला किंवा मानधन मिळत नाही तेव्हा मनस्ताप होतोच. मग ते कलाकार असो किंवा सामान्य व्यक्ती. तसाच काहीसा अनुभव अभिनेत्री गौतमी देशपांडेला आला आहे.

# हनी सिंगच्या अंगात आलं?

बॉलिवूडचा प्रसिद्ध गायक आणि रॅपर यो यो हनी सिंगची कोणतीही वेगळी ओळख सांगायची गरज नाही. तो नेहमीच चर्चेत असतो. त्याचे नुकतेच निया शर्मासोबतच 'सोल' हे गाणं देखील रिलिज झालं आहे. या गाण्याला नेटकऱ्यांची पसंतीही मिळाली आहे. त्याने आत्तापर्यंत एकाहून एक चांगली गाणी दिली आहेत. तो नेहमीच चर्चेत असतो कधी त्याच्या गाण्यामुळे तर कधी त्याच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे. गेल्या काही दिवसांपूर्वी तो त्याच्या पर्सनल लाईफमुळे देखील लाईमलाईटमध्ये होता. त्याची क्रेझ आजही प्रेक्षकांमध्ये तितकिच आहे. त्याची गाणी पार्टीमध्ये कायम वाजवली जातात.सध्या हनी सिंगचा एका लाईव्ह शो दरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडिओत हनी खुपच धमाकेदार डान्स करतांना दिसत आहे. त्याच्या चाहत्यांना हनीने आता कमबॅक केल्याचे म्हटले आहे. व्हिडिओमध्ये हनी सिंग ब्लॅक लूकमध्ये दिसत आहे.



बॉलिवूडची आघाडीची आणि लोकप्रिय अभिनेत्री करीना कपूर ही नेहमीच चर्चेत असते. तिने आजवर अनेक वेगवेगळ्या भुमिकांमधुन प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून तिचे सिनेमे बॉक्स ऑफिसवर काही खास कमाल करु शकलेले नाहीत. त्यात तिचा आमिर खान सोबतचा लाल सिंह चड्डा हा सिनेमा देखील बॉक्स ऑफिसवर फ्लॉप गेला. आता करीनाने ओटीटीकडे मोर्चा वळवला आहे.करीना कपूर खानचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'जाने जान'चा काही सेकंदाचा टिझर आता रिलिज करण्यात आला आहे. या टिझरमध्ये करीना आत्तापर्यंतच्या सर्वात वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार अशी चर्चा सुरु झाली आहे. या चित्रपटात तिच्यासोबतच जयदीप अहलावत आणि विजय वर्मा मनोरंजक भूमिकेत दिसत आहेत. या चित्रपटातून करिना ओटीटी डेब्यू करणार आहे. टिझर रिलिज करत निर्मात्यांनी चित्रपटाची रिलीज डेट आणि नाव नेटफ्लिक्सच्या अधिकृत अकाउंटवर शेअर केले आहे.शेयर केलेल्या या व्हिडिओत करीना मद्यधुंद आवाजात माइकवरून 'जाने जा' हे गाणं गात आहे तर दुसरीकडे विजय वर्मा कारमधून उतरताना दिसत आहे. हा एक फुल ऑफ थ्रिलर चित्रपट असणार आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिलयं की, चित्रपटाचे नाव 'जाने जान' आहे. हा सिनेमा 21 सप्टेंबर रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे.सुजॉय घोष दिग्दर्शित हा चित्रपट 'द व्हिोशन ऑफ सस्पेक्ट एक्स' या जपानी कादंबरीवर आधारित आहे. या सिनेमाचा ट्रेलर सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रदर्शित होईल असा अंदाज आहे. मिळालेल्या माहितीनुसार या सिनेमात करीना एका घटस्फोटित सिंगल मदरच्या भूमिकेत दिसेल. ती चुकून तिच्या एक्स पतीला मारते आणि शेजाऱ्याच्या मदतीने त्याला पोलिसांपासून लपवत असते.

# करिनानं वळवला ओटीटीकडे मोर्चा!

# एकच वादा नीरज दादा!

## » गाठली फायनल अन् ऑलिम्पिकचे तिकीट कन्फर्म

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**भारताचा स्टार ॲथलीट नीरज चोप्राने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्याने पहिल्याच प्रयत्नात ८८.७७ मीटर भालाफेक करत अंतिम फेरीत धडक मारली. नीरजसोबत डीपी मनू देखील अ गटात आहे, तर किशोर जेना हा एकमेव भारतीय गट ब मध्ये आहे. नीरज चोप्राने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये ८५ मीटरपेक्षा जास्त भालाफेक करून पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रताही मिळवली आहे.**

पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र होण्यासाठी किमान ८५.५० मीटर आवश्यक आहे आणि नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८८.७७ मीटर अंतर पार केले. नीरजशिवाय डीपी मनूनेही जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवली आहे. तीन प्रयत्नांमध्ये त्याची सर्वोत्तम धावसंख्या ८१.३१ मीटर होती, जी त्याने दुसऱ्या प्रयत्नात गाठली. त्याने पहिल्या प्रयत्नात ७८.१० आणि तिसऱ्या प्रयत्नात ७२.४० हे अंतर पार केले. पहिल्याच प्रयत्नात नीरजने मोसमातील सर्वोत्तम कामगिरी केली. यापूर्वी त्याची हंगामातील सर्वोत्तम कामगिरी ८८.६७ होती. चॅम्पियनशिपमधील अंतिम फेरीसाठी पात्रता चिन्ह ८३ मीटर ठेवण्यात आले आहे, जे नीरजने पहिल्याच प्रयत्नात सहज पार केले. या स्पर्धेचा अंतिम सामना २७ ऑगस्ट रोजी होणार आहे. याशिवाय आपल्या कामगिरीच्या जोरावर तो २०२४ मध्ये पॅरिस येथे होणाऱ्या ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे. पॅरिस ऑलिम्पिक २६ जुलै ते ११ऑगस्ट दरम्यान होणार आहे.ॲथलेटिक्समधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी पात्र होण्यासाठी, किमान ८३ मीटर भालाफेक आवश्यक आहे किंवा गटातील अव्वल खेळाडू असणे आवश्यक आहे. नीरजने पहिल्याच प्रयत्नात ८३ मीटरपेक्षा जास्त अंतर पार केले आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. नीरज वगळता कोणत्याही खेळाडूला पहिल्या प्रयत्नात ८३ मीटर अंतर पार करता आले नाही. नीरज चोप्राची ही या मोसमातील सर्वोत्तम धावसंख्या आहे. दुखापतीतून परतल्यापासून तो लॉसने डायमंड लीगमध्ये फॉर्ममध्ये नव्हता, परंतु या स्पर्धेत त्याने पहिल्या थ्रोवर खूप अंतर गाठण्यात यश मिळविले. एकाच थ्रोच्या जोरावर त्याने चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत आणि ऑलिम्पिकपर्यंत मजल मारली आहे. आतापर्यंत या स्पर्धेत भारताला एकदाही सुवर्णपदक जिंकता आलेले नाही. गेल्या वेळी नीरजने या स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. यावेळी जर त्याने सुवर्णपदक जिंकले तर तो आणखी एक इतिहास घडवेल. ॲथलेटिक्समधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या पात्रता फेरीत एकूण २७ खेळाडूंनी सहभाग घेतला.

यापैकी १२ खेळाडूंनी अंतिम फेरी गाठली. नीरज चोप्रा हा फायनलमध्ये आपले स्थान निश्चित करणारा पहिला ॲथलीट होता.नीरजने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकल्यास तो सुवर्णपदक विजेता नेमबाज अभिनव बिंद्राची बरोबरी करेल. असे केल्याने, ऑलिम्पिक आणि जागतिक चॅम्पियनशिपमध्ये वैयक्तिक सुवर्ण जिंकणारा नीरज हा दुसरा खेळाडू ठरेल. यापूर्वी नेमबाज अभिनव बिंद्राने २००८ च्या ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक तर २००६ मध्ये नेमबाजीत सुवर्णपदक पटकावले होते.




### मोसमातील सर्वोत्तम स्कोअर

» नीरज चोप्राची ही या मोसमातील सर्वोत्तम धावसंख्या आहे. दुखापतीतून परतल्यापासून तो लॉसने डायमंड लीगमध्ये फॉर्ममध्ये नव्हता, परंतु या स्पर्धेत त्याने पहिल्या थ्रोवर खूप अंतर गाठण्यात यश मिळविले. एकाच थ्रोच्या जोरावर त्याने चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत आणि ऑलिम्पिकपर्यंत मजल मारली आहे. आतापर्यंत या स्पर्धेत भारताला एकदाही सुवर्णपदक जिंकता आलेले नाही. गेल्या वेळी नीरजने या स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते. यावेळी जर त्याने सुवर्णपदक जिंकले तर तो आणखी एक इतिहास घडवेल. ॲथलेटिक्समधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या पात्रता फेरीत एकूण २७ खेळाडूंनी सहभाग घेतला. यापैकी १२ खेळाडूंनी अंतिम फेरी गाठली.

# गांगुलीने टीम इंडियाला दिला विजयाचा गुरुमंत्र!

## » फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली, तर ते विश्वचषक जिंकू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ या वर्षी ५ ऑक्टोबरपासून भारतात होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर या स्पर्धेतील पहिला सामना गतविजेता इंग्लंड आणि उपविजेता न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. हा विश्वचषक भारताच्या यजमानपदी खेळवला जाणार असल्याने त्यासाठी तो जगज्जेतेपदाचा प्रबळ दावेदार मानला जात आहे.**

भारताचा माजी क्रिकेटर सौरव गांगुलीने विश्वचषक जिंकण्यासाठी एक महत्त्वाचा सल्ला दिला आहे. भारतीय संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली म्हणाला की, या स्पर्धेत भारतीय फलंदाजांनी चांगली फलंदाजी केली, तर ते विश्वचषक जिंकू शकतात.

भारतीय संघ मजबूत असल्याचे गांगुलीने पीटीआय या वृत्तसंस्थेशी बोलताना सांगितले. भारताने चांगली फलंदाजी केली तर विश्वचषक जिंकू शकतो. भारतीय संघ ८ ऑक्टोबर रोजी चेन्नई येथे ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या विश्वचषकात आपल्या मोहिमेची सुरुवात करेल. माजी क्रिकेटपटू सौरव गांगुली म्हणाला, “भारताला चांगली फलंदाजी करावी लागेल. भारताने चांगली फलंदाजी केली तर ते जिंकतील. विश्वचषक वेगळा आहे. आशिया चषक वेगळा आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धची मायदेशातील मालिका वेगळी असेल. प्रत्येक स्पर्धेत भारतीय संघ कसा खेळतो यावर अवलंबून असेल.

भारत हा एक मजबूत संघ आहे, पण त्यांना विश्वचषकादरम्यान चांगला खेळ करावा लागेल. आशिया कप २०२३ साठी १७ सदस्यीय भारतीय संघ निवडल्याबद्दल सौरव गांगुलीने आनंद व्यक्त केला आहे.

गांगुली म्हणाला की, भारतीय संघाला फक्त चांगले खेळण्याची गरज आहे. विशेष म्हणजे, भारत आशिया चषक स्पर्धेतील पहिला सामना कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध २ सप्टेंबर रोजी खेळणार आहे.



### कोण बाजी मारणार ?

» सौरव गांगुली म्हणाला की, पाकिस्तानचा संघ संतुलित आहे आणि त्यांच्या दिवशी तो अधिक चांगला खेळून सामना जिंकू शकतो. त्याचबरोबर भारतीय संघाला यंदाच्या आठव्या आशिया चषकाचे विजेतेपदही आपल्या नावावर करायचे आहे. सौरव गांगुली म्हणाला, “पाकिस्तानचा संघ खूप चांगला आहे. त्यांच्याकडे चांगली गोलंदाजी आहे, ज्यात शाहीन आफ्रिदी, नसीम शाह आणि हरिस रौफ यांचा समावेश आहे. पाकिस्तानचा संघ अतिशय संतुलित आहे. भारतही मजबूत संघ आहे. त्या दिवशी कोण बाजी मारणार हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.